दैनिक

# महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990








लातूर वर्ष ४ थे अंक २६२ वा रविवार दि.१३ एप्रिल २०२५ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


# छ. शिवाजी महाराज महाराष्ट्रासाठीच नव्हे तर जगासाठी प्रेरणादायी

रायगड : महाराष्ट्र दौ-यावर असलेल्या केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी किल्ले रायगडाला भेट दिली. अमित शाहांकडून छत्रपती शिवरायांना अभिवादन करण्यात आले. शाहांसोबत फडणवीस, शिंदे, अजित पवारही उपस्थित होते. रायगडावरील पुण्यतिथी कार्यक्रमाला शाहांची उपस्थिती होती. यावेळी अमित शाह यांनी जनतेला संबोधित करताना छ. शिवाजी महाराज महाराष्ट्रासाठीच नव्हे तर जगासाठी प्रेरणादायी असल्याचे म्हटले आहे.

मी शिवचरित्र वाचलंय. जिजाऊंनी छत्रपतींना स्वराज्याची प्रेरणा दिली. भूमीला स्वतंत्र करण्याचा विचार जिजाऊंनी दिला, बाल शिवाजींना छत्रपती बनण्याची प्रेरणा जिजाऊंनी दिली. म्हणून मी प्रथम जिजाऊंना वंदन करतो. स्वधर्म, स्वभाषेसाठी प्राण पणाला लावणारे अपराजित सैन्य या भूमीला लाभल्याचे अमित शाह म्हणाले.

दरम्यान, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आज रायगड दौ-यावर आहेत. जनतेला संबोधित करताना पुढे म्हणाले, चारही बाजून आदिलशाही, मुघलशाहीने घेरलेला महाराष्ट्र हिंदवी स्वराज्यामध्ये बदलला. अटकपासून कटकपर्यंत हिंदवी साम्राज्य पसरले.

हळुहळू स्वधर्माची भाषा लोकांना कळू लागली. एक १२ वर्षाचा मुलगा भगवा पसरवण्याची शपथ घेतो. एका मुलाने संपूर्ण देशाला स्वराज्याचा मंत्र दिला. छत्रपतींची सेना कटक, कर्नाटकपर्यंत पोहोचली तेव्हा लोकांना विश्वास वाटला की हा देश, धर्म वाचला. स्वातंर्त्याला १०० वर्षे होतील तेव्हा भारत विकसित झालेला असेल, याची मूळ कल्पना शिवरायांनी रचल्याचेही ते यावेळी म्हणाले.

शिवचरित्र भारतातील मुलांपर्यंत पोहोचवायला हवं. शिवरायांना महाराष्ट्रापर्यंत सिमीत ठेवून नका. देशासह जगभरात शिवराय पोहोचवायला हवे, स्वभाषा, स्वधर्म, स्वराष्ट्राचे रक्षण त्यांनी केले. गुलामिकतेची मानसिकता त्यांनी तोडली. मी भाषण करायला नाही आलो तर शिवरायांकडून प्रेरणा घेण्यासाठी आलोय, असेही अमित शाह म्हणाले.

रायगड पर्यटन नव्हे तर प्रेरणास्थळ बनवणार : अमित शाह शिवाजी महाराज यांचा राज्याभिषेक झाला ती हीच जागा आहे. शिवाजी महाराज यांचा जन्म झाला ती ही जागा आहे. शिवाजी महाराजांनी शेवटचा श्वास घेतला ती ही जागा आहे.

बालशिवाजीपासून ते छत्रपतीपर्यंतचा इतिहास या पवित्र भूमीत आहे. रायगड पर्यटन नव्हे तर प्रेरणास्थळ बनवण्यासाठी आमचे सरकार कटीबद्ध आहे. सातवीपासून ते बारावीपर्यंतचे विद्यार्थी या ठिकाणी आले पाहिजे. त्यांनी महाराजांच्या कार्यापासून प्रेरणा घेतली पाहिजे, असे केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी शनिवारी सांगितले. किल्ले रायगडावर शिवाजी महाराज यांच्या





पुण्यतिथिनिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

तिघांची औपचारिक एकत्रित बैठक नाही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे रात्री साडेबारा वाजता रिट्झ हॉटेलवर मुक्कामी पोहोचल्याने रात्री तरी त्यांची अमित शाहांसोबत बैठक अशी झालीच नाही. सकाळी देखील या तिघांची औपचारिक एकत्रित बैठक अशी झालीच नाही कारण अमित शाहांना भेटायला भाजपचे स्थानिक नेते येत होते.अजित दादा देखील थेट एअरपोर्टवरच त्यांच्या स्वागताला हजर होते ते हॉटेलवर आले देखील नाहीत. सकाळी १०वाजून १० मिनिटांनी वाजता अमित शाह यांचा ताफा पुणे विमानतळाकडे गेला त्यावेळी मात्र अमित शाह, सीएम देवेंद्र फडणवीस आणि डीसीएम एकनाथ एकाच गाडीत बसून एअरपोर्ट ला गेले.पुढे ते सर्वजन एकाच विमानात बसून रायगडला पोहोचले. पालकमंत्रीपदावर तोडगा नाही

या दौ-यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे खासदार सुनील तटकरे यांनी शाह यांना जेवणासाठी आमंत्रित केले.हे आमंत्रण त्यांनी स्वीकारले असून ते दुपारी दोनच्या सुमारास तटकरे यांच्या रोह्यातील निवासस्थानी स्नेहभोजन करणार आहेत. या स्नेहभोजनात शाहंसाठी तटकरे फक्कड कोकणी बेत आखणार आहेत. शिवाय सध्या हापूस आंब्याचा सिझन असल्याने आमरस आणि आंब्याचे इतर पदार्थही असणार आहेत. रायगडच्या पालकमंत्रिपदावर शिवसेना आणि राष्ट्रवादीचाही दावा असल्याने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पालकमंत्री नियुक्तीला स्थगिती दिलीय. मात्र यावर अजून तोडगा निघालेला नाही. त्याचवेळी अमित शाह रायगड दौ-यात पालकमंत्रीपदाचा प्रश्न सुटण्याची शक्यता आहे. तटकरेंच्या रोह्यातील निवास्थानाचे भोजन यासाठी महत्वाचे मानले जातंय.. मात्र यामुळे शिवसेनेत अस्वस्थता असल्याची चर्चा आहे.

## साबला येथे क्रांतीसूर्य महात्मा ज्योतीबा फुले यांची जयंती साजरी

केज/प्रतिनिधी केज तालुक्यातील साबला येथे महात्मा ज्योतीबा फुले सार्वजिक जयंती महोत्सव , साबला यांच्या वतीने क्रांतीसूर्य महात्मा ज्योतीबा फुले यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली या कार्यक्रमाची सुरुवात समाजसेवक नरहरी काकडे व चेरमन उत्तमराव काकडे यांच्या हस्ते क्रांतीसूर्य महात्मा ज्योतीबा फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले .

यावेळी समाजसेवक नरहरी काकडे यांनी सांगितले की,क्रांतीसूर्य महात्मा ज्योतीबा फुले यांनी सर्व जाती धर्मातील मुला मुलींना शिक्षण मिळाले पाहिजे यासाठी पुणे येथील भिडेवाडा या ठिकाणी पहिली शाळा सुरू केली.तसेच अंधश्रध्दा निर्मूलनाचे कार्य केले . सत्यशोधक समाजाची स्थापना केली,जातीभेद नष्ट केल. छत्रपती शिवाजी महाराजांची समाधी शोधून पहिली शिवजयंती साजरी केली.छत्रपती शिवाजी महाराज यांच्या कार्यावर पहिला पोवाडा कुळवाडी कुळभुषण या नावाने लिहिला क्रांतीसूर्य महात्मा ज्योतीबा फुले यांची जयंती साजरी करत असताना उपस्थित मान्यवर माजी सरपंच महादेव कटारे,रंगनाथ काकडे,माजी पोलिस उपनिरिक्षक उमाशंकर शिंदे,माजी उपसरपंच दादा नाईकनवरे,ग्रामपंचायत उपसरपंच पवन सरवदे,सदस्य ज्ञानेश्वर



पांचाळ,पोपट काकडे , से.स.सो.संचालक सदाशिव काकडे , माजी ग्रामपंचायत सदस्य रामराजे शिंदे , शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष शंकर नाईकनवरे जि . प . प्रा . शाळा साबला . तसेच राजेभाऊ काकडे,मुरली रोकडे,जालींदर मुळे,लक्ष्मण काकडे,अनंत नाईकनवरे,गणेश कटारे,गुलाब मुळे,बंडू परळकर,हनुमंत मुळे,वसंत नाईकनवरे,विठ्ठल काकडे,सावता नाईकनवरे , शिवाजी काकडे , पिंटू काकडे , बाळासाहेब काकडे,भागवत नाईकनवरे,गौतम घाडगे, बाबासाहेब काकडे इत्यादींच्या उपस्थितीत क्रांतीसूर्य महात्मा ज्योतीबा फुले यांची जयंती साजरी करण्यात आली .

## जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा तरनळी शाळेत क्रांतीवीर म.जोतिबा फुले जयंती साजरी

केज/प्रतिनिधी जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा तरनळी शाळेत क्रांतीवीर म.जोतिबा फुले जयंती साजरी मी.जोतिबि फुले यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष संपत्ती सरवदे राजाभाऊ कदम अपग्रेड मुख्याध्यापक जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा तरनळी यांनी पुष्पहार अर्पण करून पुजन केले व अभिवादन केले.म.फुले यांचा जन्म ११ एप्रिल १८२७ रोजी कटगुण ता.खटाव जि.सातारा येथे झाला. वडील जोतिबा व आई चिमणाबाई.त्यांचे मूळ आडनाव गो-हे होते परंतु फुलांच्या व्यवसायामुळे फुले या नावाने ओळखले जाऊ लागले. ते सत्यशोधक होते.त्यांना मराठी, इंग्रजी, उर्दु,कन्नड,तामिळ, गुजराती इ.भाषा अवगत होत्या.प्राथमिक शिक्षण मोफत, सार्वजनिक व सक्तीचे करावे अशी मागणी त्यांनी केली.अस्पृश्यता निवारण, अंधश्रद्धा निर्मूलन यासाठी सतत प्रयत्न केले.मुलींसाठी १८४८ मध्ये पुण्यात पहिली शाळा काढली.त्यांच्या महान कार्यांमुळे



जनतेने त्यांना महात्मा पदवी १८८८ मध्ये बहाल केली. शेतक-यांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले.भारत देश स्वतंत्र करण्यासाठी प्रयत्न केले.अशी माहिती आपल्या प्रास्ताविकात जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा तरनळी शाळेचे मुख्याध्यापक राजाभाऊ कदम यांनी दिली. विद्येविना मती गेली। मतीविना नीती गेली। गतीविना वित्त गेले। वित्ताविना शुद्र खचले। इतके अनर्थ एका अविद्येने केले।। यावेळी शाळा व्यवस्थापन समिती उपाध्यक्षा सीमा मोहिते, श्रीमती गिताताई अंडील मॅडम, श्रीमती सोनाली भुमकर मॅडम,भारत हांगे सर, बाळासाहेब भिल्लु राठोड सर, श्री बाबासाहेब मैंद सर यांनी आपले मनोगत व्यक्त केले.राधाबाई आक्का खामकर, गावकरी, संगिता माने शापोआ कामगार, विद्यार्थी - विद्यार्थिनी हे उपस्थित होते.कार्यक्रमाचे सुत्रसंचलन बाळासाहेब राठोड सर यांनी केले.शेवटी भारत हांगे सर यांनी आभार मानले.

## १४ एप्रिल रोजी तुर्भे येथील जयंती उत्सवला आनंदराज आंबेडकर यांचे चिरंजीव ड .अमन आनंद राज आंबेडकर हे उपस्थित रहाणार.

नवी मुंबई / के. एच. हनवते :- रिपब्लिकन सेना नवी मुंबई जिल्हा व महामानव सामाजिक सेवा संस्था यांच्या माध्यमातून विश्वरत्न परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त मोफत आरोग्य तपासणी शिबिर आयोजित केले आहे या शिबिराला रिपब्लिक सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नातू बहुजन हृदय सम्राट तरुणांचे प्रेरणास्थान सरसेनानी आनंदराज आंबेडकर साहेब तसेच त्यांचे चिरंजीव म्हणजेच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे पणतू ऍडव्होकेट



अमन आनंदराज आंबेडकर साहेब हे उपस्थित राहणार आहेत, तरी नवी मुंबईचे सर्व तमाम बौद्ध आंबेडकर जनतेला आवाहन करण्यात येत आहे की या दिवशी रिपब्लिकन सेनेच्या वतीने मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे याचा लाभ सर्व जनतेने घेऊन परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती उत्सवामध्ये सामील व्हावे. आसे अव्हाण वीरेंद्र लगाडे नवी मुंबई जिल्हाध्यक्ष रिपब्लिकन सेना यांनी केले आहे.

## हिदु राष्ट्र निर्माण हे देशावर फार मोठे अपत्य येईल..! प्रदिप ढोबळे ( ओबीसी नेते )

नवी मुंबई / के. एच. हनवते :- प्रबुद्ध सेवा संघ जुईनगर यांच्या वतीने दिनांक - ११ एप्रिल ते १४ एप्रिल आसे सलग चार दिवसीय जयंती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले त्यावेळेस पहिल्याच सत्रात उद्घाटक - ( ओबीसी सेवा संघ महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष ) प्रदिप ढोबळे यांच्या प्रमुख उपस्थितीत दिनांक : ११ एप्रिल २०२४ रोजी उदघाटन करण्यात आले आणि अद्यसमाजसुधारक क्रांतीरत्न महात्मा जोतिराव फुले यांच्या जयंतीनिमित्त व्याख्यान आयोजित करण्यात आले होते त्यावेळेस प्रमुख वक्ते : आयु. प्रदिप ढोबळे ( ओबीसी





सेवा संघ महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष ) यांनी संबोधीत करताना म्हणाले की हिंदु राष्ट्र निर्माण म्हणजे देशातील लोकशाईवर फार मोठे आपत्य येईल..! असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी पहीलेच इशारा देऊन गेले आहेत, यातून हल्लीच्या राजकारण्यानी बोध घेतला तर लोकशाई धोक्यात येणार नाही.

# मराठवाडा विभागीय ' प्रदेशध्यक्ष' पदी श्री. रविंद्र नरवाडे यांची पदी घोषणा..!

छत्रपती संभाजी नगर (प्रतिनिधी) संपूर्ण राज्यात सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या नव्या दिशांचे नव्या दुरदृष्टीच्या नेतृत्वांची गरज आहे. देशात व राज्यात आंबेडकरी चळवळीतील असंख्य कार्यकर्ते एकनिष्ठता, अखंडता ,एकात्मता निर्माण करण्यासाठी कटिबद्ध असल्याचे दिसून येते. राज्यात सामाजिक व शैक्षणिक, सांस्कृतिक चळवळीसाठी रिपब्लिकन सन्मान सभा' एक नव्या उर्जाचे संघटनेच्या माध्यमातून जनजागृती चालू आहे रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया एक संघटीत करण्यासाठी असंख्य वेळा प्रयोग अयशस्वी ठरला आहे. त्यातून अनेक पक्षांना योग्य संधी मिळाली त्यामुळे आंबेडकरी चळवळ विभिन्न प्रकारच्या असल्याचे दिसते . परंतु डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांची दिशाहीन दिशाभूल करणारे निदर्शनास आले त्याच वेळी तो षडयंत्रांचे तुकडे तुकडे करण्याची तयारी असते. आज देशात भारतीय संविधानाच्या चौकटीत लोकशाही मार्गाने आंदोलन करत आहेत. राज्यात रिपब्लिकन सन्मान सभाचे काम एका नव्या एक सामाजिक दूरदर्शी नेतृत्वाचा मार्ग सुरू झाले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी नागसेन वनातून शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक, एक संघर्षमय प्रवास व दिशा देण्याचे काम केले. त्या नागसेन भूमीतून रिपब्लिकन सन्मान सभाने सुध्दा एक नव्या उर्जा..! नवी दिशा!! नवा संकल्प..!!! संघटनेने हाती घेतला आहे. रिपब्लिकन सन्मान सभाची एक नव्या नेतृत्वांची उर्जा..! डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक शैक्षणिक चळवळीचे ध्येय व धोरणांवर अभ्यास करून त्यांच्या विचारांवर काम करणार असे, डॉ. रोडे यांनी स्पष्ट मत मांडले. रिपब्लिकन सन्मान सभाच्या विभागीय स्तरावर आठ जिल्हांचे काम चालू केले आहे. आज विभागीय बैठकीत रिपब्लिकन सन्मान सभा च्या मराठवाडा विभागीय प्रदेशध्यक्ष पदी रविंद्र नरवाडे तर मराठवाडा विभागीय कार्याध्यक्ष पदी श्री. पृथ्वीराज निर्मळ यांची सर्वुमते निवड करण्यात आली. परभणी जिल्हातील पुर्णा येथील रविंद्र नरवाडे पत्रकार, संपादक, सामाजिक कार्य, गेली वीस वर्षांपासून आंबेडकरी चळवळीत काम करत आहेत. नरवाडे हे धाडसी, जिद्दी, एकनिष्ठ आंबेडकरी सामाजिक शैक्षणिक कार्य करत आहेत. त्यांनी स्वतःचे वृत्तपत्राच्या माध्यमातून परभणी, नांदेड, हिंगोली जिल्ह्यातील एक तरुण पिढीला प्रेरणादायी व्यक्त महत्त्व आहे. तसेच राष्ट्रीय विश्वगामी पत्रकाराचे मराठवाडा विभागीय कार्याध्यक्ष पदावर कार्यरत आहेत. त्या सामाजिक व शैक्षणिक, पत्रकारिता, आंबेडकरी चळवळीचे कार्य लक्षात घेऊन पत्रकार व संपादक. रविंद्र नरवाडे यांना मराठवाडा विभागीय प्रदेश अध्यक्ष पदाची रिपब्लिकन सन्मान सभाच्या एक नवी जबाबदारी देण्यात आली आहे. श्री. नरवाडे यांनी विभागीय स्तरावर सामाजिक, शैक्षणिक, एक नव्या



उर्जा युवकांना सोबत घेऊन संघटन, संकल्पना, संघटक, बांधणीसाठी अहोरात्र मेहनत घेणारे आहेत. रिपब्लिकन सन्मान सभाचे प्रा.डॉ.दशरथ वैजनाथ रोडे यांच्या अध्यक्षतेखाली मराठवाडा विभागीय बैठक संपन्न झाली. या प्रसंगी राजकूमार धिवार, अजय गोरे, विश्वास गायकवाड, संदेश हवने, श्रीकात राणे, जितेंद्र वलंवे, नितिन सांगळे, उमेश रोडे, आनंद भुतके, गोदाम, कांबळे, चंद्रमाने, , जालना, जीवन दिने, हरीभाऊ जावळे, भिसे, गायकवाड, हिंगोली, रामकृष्ण सिरसाठ, रणखांब राम , विविध जिल्ह्यांतील सभासदांना मार्गदर्शन केले. मराठवाडा बीड, परभणी, नांदेड, धाराशिव, हिंगोली, लातूर, जालना छत्रपती संभाजी नगर या जिल्ह्यातील असंख्य वरिष्ठ पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

दैनिक महावृत्त पहा ऑनलाईन कोठेही mhavratt.com या वेबसाईटवर पाहता येणार

## संपादकीय....

# तहव्वूर राणाला बेड्या

भारतातच नव्हे, तर संपूर्ण जगात खळबळ माजवणार्या २६/११ च्या मुंबईवरील दहशतवादी हल्ल्याच्या कटातील मुख्य आरोपी तहव्वूर राणाचे यशस्वीपणे प्रत्यार्पण होऊन, त्याला अमेरिकेतून भारतात आणण्यात आले. या हल्ल्यात १६६ लोकांचे बळी गेले होते आणि अनेक पोलिस अधिकारीही शहीद झाले होते. राष्ट्रीय तपास संस्थेच्या (एनआयए) अधिकार्यांनी विशेष विमानाने राणाला दिल्लीत आणले असून, त्याच्या प्रत्यार्पणामुळे २६-११च्या हल्ल्यामागील पाकिस्तानची भूमिका उघड होण्यास मदत होईल. हल्ल्यापूर्वी राणाने उत्तर आणि दक्षिण भारतात ठिकठिकाणी प्रवास केला होता. मुंबईतही त्याने टेहळणी केली होती आणि उलट तपासणीत त्याच्या प्रवासाचे महत्त्वाचे पुरावे मिळू शकतील. या ठिकाणांना भेट देण्यामागे देशभरातील अन्य शहरांत कारवाया करण्याचा कट रचला गेला होता काय, याची नेमकी माहिती त्याच्या चौकशीनंतरच कळेल. मुंबईवर हल्ला झाला, त्याच वर्षी दहशतवाद्यांनी भारतात अनेक हल्ले घडवले. जयपूरमध्ये १३ मे २००८ रोजी रात्रीच्या सुमारास अवघ्या १२ मिनिटांच्या कालावधीत विविध ठिकाणी सायकलींचा वापर करून, ७ ठिकाणी बॉम्बस्फोट झाले. ‘सिमी’ व ‘इंडियन मुजाहिदिन’ या संघटनांनी ते घडवून आणले. या संघटनांचा लष्कर-ए तैयबाशी संबंध होता. २५ जुलै २००८ रोजी बंगळुरूतील विविध भागांत भरदिवसा एकापाठोपाठ एक असे नऊ बॉम्बस्फोट झाल्यामुळे संपूर्ण देश हादरला होता. माहिती-तंत्रज्ञान उद्योगाचे बंगळुरू हे एक प्रमुख केंद्र असल्याने या बॉम्बस्फोटांमागे भारताची आर्थिक घडी विस्कळीत करण्याचा उद्देश होता.

बांगला देशमधील ‘हरकत उल जिहाद अल इस्लामी’ म्हणजेच ‘हुजी’ या दहशतवादी संघटनेचाही त्यामागे हात होता. त्याच वर्षी २६ जुलैला अहमदाबादमध्ये एकापाठोपाठ २१ बॉम्बस्फोट घडवण्यात आले. यापैकी बहुतांश बॉम्बस्फोटांमध्ये शहरातील सार्वजनिक बससेवेला लक्ष्य करण्यात आले. १३ सप्टेंबर २००८ रोजी दहशतवाद्यांनी दिल्लीच्या करोलबाग, कॅनॉट प्लेस, ग्रेटर कैलाश आदी पाच ठिकाणी बॉम्बस्फोट केले. ते घडवून आणणार्या इंडियन मुजाहिदीनच्या पाच दहशतवाद्यांनी दक्षिण दिल्लीतील जामियानगर भागात बाटला हाऊसजवळील एका इमारतीत आश्रय घेतल्याची माहिती मिळाल्यानंतर दिल्ली पोलिसांनी तिथे छापा टाकला. त्यावेळी चकमकीत दोन दहशतवादी ठार, तर एक पोलिस अधिकारी शहीद झाला होता. २००८ मध्ये त्रिपुरा, मणिपूर, आसाममध्ये बॉम्बस्फोट झाले आणि २९ सप्टेंबर २००८ रोजी महाराष्ट्रात मालेगावमध्ये दोन बॉम्बस्फोट झाले. थोडक्यात, २००८ हे भारताच्या दृष्टीने काळे वर्ष ठरले. डेव्हिड हेडली ऊर्फ दाऊद गिलानी हा मूळ पाकिस्तानी वंशाचा अमेरिकी नागरिक असून, २००८च्या कटाचा तो एक सूत्रधार होता. पाकिस्तानमधून अमेरिकेत ड्रग्जचे स्मगलिंग करण्याच्या प्रकरणात त्याला अटकही झाली होती. त्यानंतर पाकिस्तानमधील ड्रग्ज व्यवहारांची माहिती देण्याच्या बदल्यात हेडलीची शिक्षा कमी करण्यात आली. तुरुंगातून सुटका झाल्यानंतर हेडली पाकिस्तानला गेला, तेव्हा त्याचा लष्कर-ए तैयबाशी संबंध आला. त्यानंतर अमेरिकेच्या नकळत त्याने पुन्हा पुन्हा पाकिस्तानला भेट देऊन तैयबाचा नेता हाफिझ सईदशी संपर्क वाढवला. या संघटनेस पाकिस्तानच्या आयएसआयचे पूर्ण पाठबळ होते व आहे. त्याचवेळी हेडली हा अमेरिकेच्या ड्रग एन्फोर्समेंट अ‍ॅथॉरिटीसाठी खबर्या म्हणून काम करतच होता. तसेच त्याचवेळी अमेरिकन सरकारच्या नकळत तो तैयबासाठी निधी उभारणे आणि जिहादींची भरती करणे ही कामेही हाताळत होता.

हेडली २००६ ते २००८ या दोन वर्षांत आठवेळा मुंबईत आला होता. त्या काळात त्याने हल्ला झालेल्या ठिकाणांची रेकी केली होती. त्याचा मुंबई दौरा व्यावसायिक असल्याचे दाखवले गेले. राणाचा इमिग्रेशनचा व्यवसाय होता व त्याचाच आधार घेऊन, त्याच्या कंपनीची एक शाखा मुंबईतील ताडदेवमध्ये सुरू असल्याचे चित्र उभे केले होते. पाकिस्तानात स्थायिक असताना राणा तेथील लष्करात वैद्यकीय विभागात काम करत होता. १९९० मध्ये त्याने लष्करातील नोकरी सोडून कॅनडाचे नागरिकत्व स्वीकारले. तेथून तो अमेरिकेत स्थायिक झाला. पाकिस्तानच्या लष्करात काम करणार्या जवानांच्या डोक्यात भारताविषयीचे विष पेरले जाते आणि म्हणूनच राणा हा यथावकाश दहशतवादी कारवाया करू लागला, हे लक्षात घेतले पाहिजे. हेडलीने भारतात टेहळणी केली, तेव्हा त्याने थेट पाकिस्तानात फोन करण्याऐवजी राणाशी संपर्क साधून ती माहिती पाकपर्यंत पोहोचवण्याचे तंत्र चलाखीने वापरले. शिवाय मुंबईवरील हल्ल्यापूर्वी हेडलीऐवजी राणा मुंबईत आला होता. २६-११ मधील हाफिझ सईद प्रभृतींचा सहभाग सिद्ध करणारे अनेक पुरावे पाक सरकारला देण्यात आले; पण पाक सरकारने त्याबाबत ठोस कारवाई शेवटपर्यंत टाळली.

२६-११ हल्ल्याला पाकिस्तानी दहशतवादीच जबाबदार होते, असे पाकिस्तानचे माजी पंतप्रधान नवाझ शरीफ यांनी एका वृत्तपत्राला ७ वर्षांपूर्वी दिलेल्या मुलाखतीत मान्य केले होते; मात्र पाकिस्तानमध्ये लष्कराच्या आदेशानुसारच पंतप्रधानांना वागावे लागते आणि त्यामुळे पाक सरकारने वारंवार याबाबत कानावर हातच ठेवले; पण भारताने चिकाटी न सोडता राणाच्या प्रत्यार्पणाबाबत आग्रह धरला आणि ट्रम्प यांनी त्यास सकारात्मक प्रतिसाद दिला. पाच वर्षांपूर्वी एनआयएने प्रत्यार्पणाबाबत औपचारिक विनंती केली आणि त्यासाठी कायदेशीर व राजनैतिक मार्गाने अथक प्रयत्न करण्यात आले. मुंबई हल्ल्यातील आरोपी अजमल कसाबवर खटला चालवून, त्याला मागेच फाशीही देण्यात आली; पण हाफिझ सईद, झाकिऊर रहमान नकवी आणि तैयबाच्या अन्य दहशतवाद्यांवर खटला चालवण्यासाठी पाकने भारतास कोणतेही सहकार्य केलेले नाही. आता राणाकडून मिळणार्या माहितीच्या आधारे पाकिस्तानचा दहशतवादी बुरखा संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा मंडळासारख्या जागतिक व्यासपीठावरही फाडणे शक्य होणार आहे. पाकिस्तानमधील जिहादी प्रवृत्तींना मदत करणार्या या देशविघातक प्रवृत्ती शोधून काढून, त्यांचा संपूर्ण बिमोड करण्याचे आव्हान आता केंद्र सरकारपुढे आहे.

# सत्यधर्म सांगणारा महात्मा

जातिभेदाचा आणि धर्मभेदाचा धिक्कार करून मानवी समतेचा पुरस्कार करण्यात आपली उभी हयात वेचलेले समाजसुधारक म्हणजेच ‘महात्मा ज्योतिराव फुले’. त्यांच्या जयंतीनिमित्त

महात्मा फुले हे खरे समाजशिक्षक होते. समाज परिवर्तनासाठी रचनात्मक कार्य आणि रचनात्मक कार्यासाठी समाज परिवर्तन त्यांनी अपरिहार्य मानले. या दोहोंचा मूळ पाया त्यांचा क्रांतीगर्भ विचार हा होता. अस्पृश्य आणि अस्पृश्यता यासंबंधी त्यांनी वेळोवेळी मांडलेले परखड विचार ही त्याची साक्ष होय.

आज प्रचलित असलेल्या राजकीय विचारांच्या अनुषंगाने जर महात्मा फुले यांचा विचार केला तर असे दिसते की, महाराष्ट्र समाजाला पहिल्यांदा वर्गीय जाणीव आणि वर्गीय दृष्टी देण्याचे काम महात्मा फुले यांनी केले; परंतु या वर्गीय जाणिवेतून वर्गविहित समाजाची निर्मिती होईल असे स्वप्न त्यांनी उराशी बाळगले होते.



महात्मा फुले यांचा प्रयत्न केवळ महाराष्ट्राच्याच दृष्टीने नव्हे तर संपूर्ण भारताच्या दृष्टीने अभिनव होता. विसावे शतक हे राजकारण सर्वस्पर्शी करणारे शतक असल्याने भारतातील सर्व सामाजिक प्रश्नांना हळूहळू राजकीय स्वरूप येऊ लागले. त्यामुळे सामाजिक प्रश्न सुटण्याऐवजी ते अधिक गुंतागुंतीचे तर झालेच; परंतु राजकीय चळवळीसुद्धा त्यामुळे अधिक अडचणीत आल्या. महात्मा फुले यांनी स्वातंत्र्यप्राप्तीसाठी आणि भारत एक राष्ट्र होण्यासाठी जो सामाजिक न्यायाचा विचार पुढे केलेला होता तो अतिशय महत्त्वाचा आहे.

महात्मा फुले यांनी आपल्या साहित्यातून तत्कालीन समाजातील जातिभेद, अनिष्ट प्रथा तसेच समाजातील उच्चवर्णीयांची मक्तेदारी याविरुद्ध आपल्या प्रतिक्रिया मांडल्या. त्याकाळच्या समाजाला प्रबोधनाची व सामाजिक परिवर्तनाची दिशा दाखवण्यासाठी त्यांनी लिहिलेले ग्रंथ हे मार्गदर्शक व प्रेरणादायी ठरले. समताधिष्ठित समाजाच्या निर्मितीमध्ये महात्मा फुले यांनी मोलाचे योगदान दिलेले आहे. तत्कालीन समाजाचे झालेले वर्गनिष्ठ विभाजन आणि त्यातून निर्माण झालेली सामाजिक व आर्थिक विषमता त्यांना प्रकर्षाने जाणवली होती. या समाजात मूठभर लोकांच्या ठिकाणी सामाजिक वर्चस्व आणि आर्थिक सत्ता केंद्रित झालेली आहे व हा वर्ग समाजातील बहुजनांची सामाजिक व आर्थिकदृष्ट्या पिळवणूक करीत आहे हे त्यांच्या लक्षात आलेले होते. या सामाजिक व आर्थिक वर्चस्वाचे मूलाधार आणि त्यातून निर्माण होणार्या अन्यायाचे स्वरूप यांचे विश्लेषण करण्याचा प्रयत्न त्यांनी केला. महात्मा फुले यांच्या विचारांचा संदर्भ व दिशा वेगळी होती.

त्याकाळी प्रचलित असलेल्या सुधारणावादी विचारांपेक्षा वेगळा विचार मांडून त्यांनी नंतरच्या काळात जोम धरलेल्या क्रांतिवादी विचारसरणीचा पायाच घातला. कष्टकरी वर्गाच्या आर्थिक दु:स्थितीचे विलक्षण विदारक चित्र त्यांनी आपल्या लिखाणात निरनिराळ्या ठिकाणी रेखाटले आहे. वस्तुतः शेतकरी हा भारतीय समाजातील सर्वात महत्त्वपूर्ण असा उत्पादक गट, समाजाचे पोषण करणारा हा वर्ग पण त्याच्या वाट्याला आलेले ते चिरंतन दारिद्र्य सामाजिक वास्तवाचा अचूक वेध घेणार्या त्यांच्या नजरेतून हा परस्परविरोध सुटू शकला नाही. सामाजिक व आर्थिक समतेवर आधारलेला शोषणविरहित असा समाज निर्माण करण्याचे त्यांचे स्वप्न होते.

धर्माच्या आधारे निर्माण झालेली सामाजिक विषमता नष्ट झाली पाहिजे व सर्वजण मानव म्हणून एकत्रित आले पाहिजेत असा त्यांचा आग्रह होता.फुले हे धर्मविरोधक नव्हते; परंतु त्याकाळी धर्माला आलेले विकृत स्वरूप कर्मकांडाचे व पुरोहित वर्गाचे प्राबल्य व लोकांच्या अंधश्रद्धेचा फायदा घेऊन केली जाणारी धार्मिक पिळवणूक त्यांना मान्य नव्हती. म्हणून मानवतावादाचा पुरस्कार करणार्या एका नव्या ‘सार्वजनिक सत्यधर्माची’ कल्पना त्यांनी पुढे मांडली. शूद्रातिशुद्रांची सामाजिक दास्यातून मुक्तता व्हावी, जातिभेद व अस्पृश्यता नष्ट व्हावी तसेच पुरुषांनी लादलेल्या रूढींच्या जोखडातून स्त्रियांची मुक्तता व्हावी, असेही त्यांना वाटत होते. स्त्रियांना पुरुषांइतके स्वातंत्र्य व हक्क उपभोगता येऊ शकतील अशी समाजरचना त्यांना निर्माण करावयाची होती. म्हणून स्त्री शिक्षणाचा आग्रह धरून मुलींसाठी पहिली शाळा सुरू केली.

महात्मा फुले यांच्या लिखाणाचे समग्र परिशीलन केल्यानंतर त्यांच्या मर्मग्राही व सर्वस्पर्शी बुद्धिमत्तेची व सखोल चिंतन करणार्या वृत्तीची प्रचिती पदोपदी येते. त्याचबरोबर भविष्यकाळाचा अचूक वेध घेणार्या त्यांच्या बौद्धिक क्षमतेचीही साक्ष पटते. समाजातील तळागाळातील लोकांच्या समस्यांना वाचा फोडण्याचे कार्य आधुनिक काळात फुले यांनी प्रथमतः केले. यात त्यांचे महात्मेपण आहे. या समस्यांचे निराकरण फुटकळ स्वरूपाच्या सुधारणा घडवून आणणार्या जुजबी उपाययोजनांनी होणार नाही, त्यासाठी समाजरचनेची सबंध चौकट बदलणे जरुरीचे असा सामाजिक क्रांतीचा विचार त्यांनी मांडला.

छत्रपती शिवाजी महाराज यांची रायगडावरील समाधी शोधून त्यांच्यावरील पहिला पोवाडा लिहिण्याचे कार्य महात्मा फुले यांनी केले. फुले हे सामाजिक कार्यासोबतच यशस्वी लेखक आणि संपादक होते. तत्कालीन व्यवस्थेत समाजजीवनाची स्थिती, वर्णभेद यावर त्यांनी त्यांच्या लेखनशैलीतून कडाडून टीका केली. यातील ‘तृतीय रत्न’ हे वयाच्या २८ व्या वर्षी १८५५ मध्ये त्यांनी लिहिलेले एक महत्त्वपूर्ण नाटक आहे. ‘सार्वजनिक सत्यधर्म’ हा समाजाला दिशा देणारा एक महत्त्वपूर्ण संदर्भ ग्रंथ त्यांनी तयार केला. समाज व्यवस्थेला दिशा देणारा ‘गुलामगिरी’ हा महत्त्वपूर्ण ग्रंथ महात्मा फुले यांनी लिहिला. फुले यांच्या सामाजिक कार्याची दखल घेऊन लोकांनी त्यांना मुंबईतील सभेत १८८८ मध्ये ‘महात्मा’ ही उपाधी दिली. त्यामुळे जोतीराव फुले हे महात्मा फुले या नावाने ओळखले जाऊ लागले.

या महात्म्याबद्दल महर्षी विठ्ठल रामजी शिंदे म्हणतात–

कुणी शिकून शहाणे ठरले।  
कुणी विकून पुढारी बनले ।।  
कुणी भिकून महात्मे झाले ।  
परि सरळा सेवक विरळा।।  
महाराष्ट्र ज्ञानेशाचा । महाराष्ट्र तुकयाचा  
ज्योतिबा हा लोकांचा ।  
महाराष्ट्र सुधारक आगळा ।।

# उच्च शिक्षित बेरोजगारी

अनस्टॉप टॅलेंट रिपोर्ट २०२५ प्रसिद्ध झाला. त्यानुसार देशातील जवळपास ८३ टक्के इंजिनिअर आणि ४६ टक्के बिझनेस स्कूलमधील पदवीधर बेरोजगार आहेत. इंजिनिअर खोर्याने तयार झालेले आहेत आणि त्यांना आता जॉब मिळणे मुश्कील झाले आहे हे या रिपोर्टवरून समजू शकते. मध्यंतरी एक अहवाल आला होता की ज्यात ५० टक्क्यांपेक्षा अधिक इंजिनिअर हे कामाचेच नाहीत. काम आहे की नाही हा इश्यू नंतरचा. मुळात ते कामाचेच नाही असं तो अहवाल दाखवत होता. या सर्व प्रश्नाला अनेक प्रकारचे पैलू आहेत सामाजिक, राजकीय, आर्थिक तसेच औद्योगिकही. सामाजिक बाबतीत म्हणाल तर आजही कित्येक लोकांना इंजिनिअर म्हणून एक वलय कमीत कमी नावाला तरी वाटू लागलेले आहे. भले तो काय करतो हा नंतरचा विषय. त्यामुळे घरातलेही मारून मुटकून इंजिनिअरिंगला पाठवतात. काही ठिकाणी तर इंजिनिअर म्हटलं की पुढे मुलाला हुंडा मिळतो. हुंडा पद्धती कागदावर कुठेही नाही हे माहिती आहे, तरी समाजात काय आढळून येतं हेही सगळ्यांना माहिती आहे. ते सगळं एक ओपन सिक्रेटच आहे. त्यामुळे आपला मुलगा, मुलगी इंजिनिअर व्हावं अगदी त्याला कितीही मार्क असतील तरीही इकडे तिकडे धावाधाव करून डोनेशन देऊन या सामाजिक तथाकथित स्तराकरता इंजिनिअर बनवण्याचा कित्येकांचा अट्टहास असतो.



आता राजकीय बाजू म्हणाल, तर तुम्हाला माहिती आहे राजकारणी कुठेही शिरत नाहीत? जिथे मालामाल होता येईल तिथे ते घुसणारच. अशामुळे अंगठेबहाद्दर (शब्दश: तसे नसले तरी शिकवण्याच्या बाबतीत नक्कीच) लोक शिक्षणसम्राट होऊ लागलेले आहेत. सत्तेपुढे शहाणपण नसल्यामुळे त्यांच्या मनाला वाटेल तसे ते कॉलेजेस काढू लागलेले आहेत आणि त्यातून कोणते इंजिनिअर निर्माण होतात ते आपण पाहत आहोतच. बरं तिथे असलेला स्टाफही त्याच प्रकारचा असतो. त्यांना काही सोयी सवलती नसतात. थोडक्यात, ते पॉश वेठबिगारी असं म्हटल्यास अयोग्य ठरणार नाही. शिक्षणाला ज्यावेळी व्यवसाय म्हणून पाहण्याची दृष्टी सुरू झाली त्याचवेळी शिक्षणाचा दर्जा खालावला गेलेला आहे. महात्मा गांधींनी शिक्षणाची अतिशय सोपी व्याख्या सांगितली होती ‘शिक्षण म्हणजे व्यक्तीचा सर्वांगीण विकास होय’. आज आपण पाहतो की दहावी-बारावीतील केवळ पर्सेंटेज पाहूनच पुढे जातात. त्यानंतरही सीईटी किंवा स्पर्धा परीक्षा याचं एवढं मोठं अवडंबर आहे की त्याच मार्गात लोक पुन्हा पकडले जातात. त्यावर अ‍ॅडमिशन निश्चित केलं जातं. जसं जसं पुढे जाऊ तसे तसे चांगली कॉलेजेस कमी होत असल्यामुळे ही स्पर्धा भयानक वाढत आहे.

मग अनेक क्लासेस जे विद्यार्थ्यांना त्या सीईटीच्या परीक्षेला पास करण्यात मदत करतात. थोडक्यात, त्यांना परीक्षार्थी करतात. त्याला काय येतं, येत नाही यापेक्षा तो स्पर्धा परीक्षा कशी पास होईल त्याच्याकडे लक्ष केंद्रित केले जाते. त्यासाठी वारेमाप फी ही आकारली जाते व ते देणारेही आहेत कारण सामाजिक पत? अशामुळे महात्मा गांधींनी दिलेल्या शिक्षणाची व्याख्या जरी असली तरी त्यातील ‘सर्वांगीण’ हा शब्द हळूहळू पुसला जात आहे. केवळ व्यक्तीचा विकास, कसला गुण कमावण्याचा विकास पाहिला जात आहे. हा असा विकास मग सगळं भकास करतो.

आता आर्थिक पैलू पाहू. पूर्वी उच्च शिक्षण घ्यायला केवळ श्रीमंत लोक जायचे. म्हणजे गरीब जरी हुशार असला तरी त्याला खूप कष्ट असतात. म्हणजे त्याला अ‍ॅडमिशन जरी मिळाले तरी तिथे पुढचा खर्चही त्याला झेपत नसे अशी परिस्थिती होती. पण आता चित्र पूर्णपणे पालटलं गेलं आहे. श्रीमंत तर कसाही जाऊ शकतो तो आता हुशार असला पाहिजे असं नाही. पण यात मुख्य धोका असा आला आहे की त्यामानाने गरीब असणारे पण तरीही डोनेशन देऊन, शिक्षणासाठी कर्ज घेऊन मारून मुटकून विद्यार्थ्याला इंजिनिअर करण्याच्या मागे आहेत. केवळ गरिबीमुळे शिक्षण राहू नये, असा उदात्त विचार असला तरी त्यातून आता वेगळाच फायदा घेतला जात आहे. उठ सुठ जो तो अगदी सुमार असला तरीही तो इंजिनिअर, डॉक्टर बनण्याच्या मागे आहे. कॉलेजला भरमसाठ फी लागते त्यासाठी बँक आहे. कॉलेज पाहून लगेच लोन पास करत आहेत.

अशा खासगी पेव फुटलेल्या कॉलेजमध्ये अत्यंत विदारक परिस्थिती असते. कित्येक वेळेला त्यांचे स्टाफ व इतर सहाय्यक लोक यांनाही त्यांचे वेतन वेळेवर व जे ठरवलेले आहे तसे कायद्याप्रमाणेही मिळत नाही. मध्यंतरी तशी बातमी आली होती की चेक जरी दिला तरी नंतर त्यांना पैसे आणून द्यायला सांगत, अशीही काही ठिकाणी परिस्थिती होती. म्हणजेच खासगी महाविद्यालय ही केवळ पदवी छापून देण्याचा कारखाना ठरू पाहात आहेत.

आता आपण औद्योगिक पैलू पाहू. शेवटी उद्योजक हे त्यांचा फायदा करण्याकरता कंपनी वा व्यवसाय करीत असतात. पूर्वी कमीत कमी पगार देऊन ते कामावर घेण्याचा प्रयत्नही करत असत. आताही काही ठिकाणी होत आहे; पण आता बरेच ठिकाणी पगाराबाबतीत काही विशेष समस्या राहिलेली नाही. चांगल्या कंपन्यांमध्ये जर का व्यक्तीला व्यवस्थित काम असेल, तर त्यालाही चांगले वेतन दिले जात आहे. अगदी हुशार विद्यार्थ्यांना कॅम्पस्मधूनही चांगल्या वेतनावर घेतले जात आहे. पण एकूण विद्यार्थ्यांच्या मानाने ती संख्या अत्यंत अल्प आहे. मग उरलेले इंजिनिअर अनेक ठिकाणी जे मिळतील तेही जॉब स्वीकारताना आपण पाहत आहोत. आज बँकेच्या स्पर्धा परीक्षांमध्ये किंवा अशा अनेक जागा जिथे केवळ पदवी हवी आहे तेथे बघा इंजिनिअर लोकांची संख्या भरपूर दिसून येते. हाडाचे शिक्षक गेले तसे हाडाचे इंजिनिअरही रसातळाला जाऊ लागलेले आहेत. खरोखर ज्यांच्यात कला आहे किंवा आर्थिक बाबीचे ज्ञान आहे अशा बीए, बी.कॉम हवं आहे अशा ठिकाणी इंजिनियर घुसू लागलेले आहेत.

आपण आता एक वेगळी बाजू पाहू. शिक्षण सम्राट हे शिक्षणाकडे सेवा वगैरे न पाहता व्यवसाय म्हणून पहात आहेत. ठीक आहे मग त्या व्यवसायात त्यांनी येणार्या विद्यार्थ्यांना त्याप्रमाणे चांगले घडवून दाखवावे व त्यांना त्यांच्या पायावर पुढे उभे करणे ही जबाबदारी घ्यावी. उद्योग धंदा व चांगल्या नोकर्या मिळतील असे त्यांनी उभे करून दाखवावे व त्याची त्यांनी गॅरंटी घ्यावी. खासगी कॉलेजांना व्यवसाय म्हणून त्यातील पैसा हवाय पण त्याचे नंतर त्या विद्यार्थ्यांचे भवितव्य घडवण्याची जबाबदारी नको. असाच दुटप्पीपणा चालू आहे.

सुरुवातीला कॉलेजांची आवश्यकता होती हे मान्य. पण आता तो फुगा एवढा फुगलेला आहे की अनेक कॉलेजांत दरवर्षी जागा रिकाम्या राहत आहेत. सरकारने याबाबतीत कठोर नियमावली करून काहीतरी मार्ग काढणे आवश्यक आहे. म्हणजे काही कॉलेजांची परवानगी रहित करणे वगैरे. कॉलेजमध्ये विद्यार्थ्यांच्या ५० हजार जागा जर रिक्त राहत आहेत तर इतर कॉलेजमध्ये तरी त्याची भरती होऊ लागेल. शिक्षण देत असताना केवळ अध्ययन म्हणून नव्हे तर वैयक्तिक किंवा सर्वांगीण विकास कसा होईल हे पाहणे सर्वच कॉलेजांना आवश्यक आहे.

यातूनच नवी पिढी बोध घेऊ शकते. विद्यार्थ्यांना डोके नसते असे नाही फक्त ते व्यवस्थित शोधून घेणे व त्याप्रमाणे त्याला आवश्यक ती मदत करणे जेणेकरून या व्यावसायिक जगात तो विद्यार्थी उत्तुंग झेप घेऊ शकेल. तो अशी झेप घेईल की ती घेतल्यावर तो अनेक विद्यार्थ्यांनाही त्याच्या व्यवसायात सामील करून घेऊ शकेल. नोकरी मिळवण्यापेक्षा नोकरी निर्माण करणार्या इंजिनिअरची येथे अधिक आवश्यकता आहे. त्याच दृष्टीने सरकार दरबारातील व्यक्तींनी यात विशेष लक्ष घालून पुढील पिढीसाठी योग्य तो रोड मॅप करावा.

# डिजिटल मीडियाच्या नव्या युगात महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाची भक्कम पावले - सांगलीत राज्य अधिवेशनात मंत्री चंद्रकांत दादा पाटील यांचा सत्कार!













सांगली (प्रतिनिधी): महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या वतीने भव्य डिजिटल मीडिया अधिवेशनाचे आयोजन एस. बी. आय. कॉलेज, सांगली येथे करण्यात आले. या अधिवेशनाचे विशेष आकर्षण ठरले ते राज्याचे तंत्र शिक्षण मंत्री मा. चंद्रकांत दादा पाटील यांचा करण्यात आलेला भव्य सत्कार!

मंत्री चंद्रकांत दादा पाटील यांचा सन्मान खोबऱ्याचा हार, शाल, पुष्पगुच्छ व सन्मानचिन्ह देऊन करण्यात आला व उपस्थित मान्यवरांचे स्वागत डॉ. विश्वासराव आरोटे यांच्याकडून करण्यात आले तसेच या गौरव सोहळ्याचे औचित्य साधून उपस्थित मान्यवरांनी डिजिटल माध्यमांच्या वर्तमान व भविष्यकालीन वाटचालीवर भाष्य करत पत्रकारांच्या कार्याची प्रशंसा केली.

सत्कार समारंभ महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य संघटक संजय भोकरे यांच्या हस्ते पार पडला. या कार्यक्रमास राज्य सरचिटणीस व दैनिक 'समर्थ गांवकरी'चे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे, निवड समिती अध्यक्ष रुपेश पाडमुख, पश्चिम महाराष्ट्र विभागीय अध्यक्ष राजेंद्र कोरटे पाटील हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

कार्यक्रमात ऑल इंडिया जर्नलिस्ट असोसिएशनचे राष्ट्रीय अध्यक्ष अशोक वानखेडे आणि आमदार गोपीचंद पडळकर यांचाही सन्मान करण्यात आला. त्यांना देखील शाल, पुष्पगुच्छ आणि स्मृतिचिन्ह प्रदान करण्यात आले.

यावेळी प्रदेश प्रसिद्धीप्रमुख नवनाथ जाधव, प्रदेश उपाध्यक्ष अशोक देडे, पत्रकार संघाचे प्रवक्ते रमेश डोंगरे, अहील्यानगर जिल्हाध्यक्ष दत्ता गाडगे, सांगली जिल्हाध्यक्ष प्रताप मिटकरी, श्रीनिवास शिंदे, संजय फुलसुंदर, बाबाजी वाघमारे, नांदेड जिल्हा अध्यक्ष मोहन पवार, सातारा जिल्हाध्यक्ष प्रवीण कांबळे, प्रदेश कार्यकारणी सदस्य स्वामी राज गायकवाड यांच्यासह अनेक मान्यवर, पत्रकार व संघाचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

डिजिटल युगातील पत्रकारितेचे महत्त्व:

अधिवेशनात डिजिटल मीडिया आव्हाने आणि संधी या विषयावर परिसंवाद आयोजित करण्यात आला होता. यामध्ये डिजिटल पत्रकारितेची वाढती भूमिका, खोट्या बातम्यांचा प्रसार, सोशल मीडियातील जबाबदारी, तसेच नव्या पिढीतील पत्रकारांची दिशा यावर सखोल चर्चा करण्यात आली.

उपस्थित वक्त्यांनी सांगितले की, डिजिटल मीडियामुळे बातम्या झपाट्याने लोकांपर्यंत पोहोचत आहेत, मात्र त्याचवेळी पत्रकारांनी सत्यतेची पडताळणी करूनच बातम्या सादर केल्या पाहिजेत.

पत्रकार संघटनांनी यामध्ये मार्गदर्शकाची भूमिका बजावणे आवश्यक असल्याचे मत यावेळी मांडण्यात आले.

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या डिजीटल मिडिया विभागाच्या जिल्हाध्यक्ष व सरचिटणीस पदांवर नवनियुक्ती!

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई यांच्या वतीने डिजीटल मिडिया विभागासाठी विविध जिल्ह्यांमध्ये जिल्हाध्यक्ष आणि सरचिटणीस पदांवर नव्या नियुक्त्यांची घोषणा करण्यात आली आहे. पत्रकार संघटनात्मक बळकटीसाठी ही नियुक्ती करण्यात आली असून राज्यभरातील सर्वच प्रमुख जिल्ह्यांचा यामध्ये समावेश आहे.

जिल्हाध्यक्ष पदी नियुक्त:

संभाजीनगर – जावेद पटेल
जालना – राहुल मुळे
लातूर – सुनिल कांबळे
परभणी – मोहम्मद सिद्दीकी
हिंगोली – उमेश चक्कर
नांदेड – सय्यद अब्दुल गफुर
जळगाव – आयाज मोहसीन
धुळे – सचिन पाटील
मुंबई – सुरेश पाटील
सातारा – अस्लम मुल्ला
अमरावती – सागर डोंगरे
सोलापूर – महेश गायकवाड (म्हाडा)
अकोला – संजय दास
ठाणे – अमित जाधव
अहिल्यानगर – श्रीकांत जाधव (उत्तर)
नंदुरबार – राजमल जैन
रायगड – अमोलकुमार जैन
रत्नागिरी – निसार शेख
पालघर – विकास पाटील
नाशिक – ज्ञानेश्वर तूपसुंदर
नागपूर – शरद नागदेवे, वैभव शहाणे
गडचिरोली – महेश गुंडेट्टीवार
भंडारा – मोहन राय
बुलढाणा – शौकत शहा
चंद्रपूर – राहुल थोरात
गोंदिया – रितेशकुमार अग्रवाल
धाराशिव – अहमेद शेख
सिंधुदुर्ग – समिल दळवी
वर्धा – राहुल मून
वाशिम – संजय खडसे
यवतमाळ – सचिन जिथे

सरचिटणीस पदी नियुक्त:

संभाजीनगर – सचिन गाडे
जालना – गणेश सातपुते
लातूर – आनंद दवणे
परभणी – राहुल धबाले
हिंगोली – राम घोडेकर
नांदेड – वैजनाथ सोनटक्के
जळगाव – चेतन निंबोळकर
धुळे – गणेश पाटील
मुंबई – विष्णू बुरे
सातारा – कैलास थोरवडे
अमरावती – मनीष गुढदे
सोलापूर – राजेश जगताप
अकोला – सम्राट गायकवाड
अहिल्यानगर – विनोद गायकवाड (दक्षिण)
नंदुरबार – नितीन सावळे
नाशिक – नितीन चव्हाण
नागपूर – अनिकेत उमरेडकर
गडचिरोली – श्रीधर दुगारापालटी
बुलढाणा – रवींद्र वाघ
चंद्रपूर – केवलसिंग जुनी
धाराशिव – एस. के. गायकवाड
सिंधुदुर्ग – कृष्णा सावंत
वर्धा – प्रशांत अवचट
वाशिम – संमय आंदुर्गे

या नियुक्त्या पत्रकार संघटनांना डिजीटल युगात अधिक प्रभावीपणे कार्य करण्यास मदत करतील, असे विभागीय अध्यक्षांनी सांगितले. नवीन पदाधिकाऱ्यांना संघटनेच्या कामकाजात यश मिळो, अशा शुभेच्छा देण्यात आल्या आहेत.

कार्यक्रमाची सांगता उत्साहात:

या भव्य अधिवेशनाची सांगता जल्लोषात झाली. कार्यक्रमाचे नियोजन व अंमलबजावणी अतिशय उत्कृष्टरीत्या करण्यात आल्याबद्दल राज्य संघटक संजय भोकरे आणि त्यांच्या कार्यकारिणीचे सर्वत्र कौतुक झाले. उपस्थित मान्यवरांनी संघटनेच्या पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

## आर. माधवनने २१ दिवसांत कसे घटवले वजन? जिम किंवा धावणे नाही; त्यांनी केले 'या' गोष्टींचे काटेकोरपणे पालन

भारतीय अंतराळ संशोधन संस्थेचे माजी वैज्ञानिक नंबी नारायणन यांच्या आयुष्यावर आधारित 'रॉकेट्री : द नंबी इफेक्ट' हा सिनेमा २०२२ मध्ये प्रदर्शित झाला. या सिनेमाच्या निर्माता, लेखक, दिग्दर्शक या जबाबदाऱ्या त्यांनी सांभाळल्याच पण त्यातील मुख्य भूमिकासुद्धा आर. माधवन यांनी केली आहे. चित्रपटाच्या चित्रीकरणादरम्यान आर. माधवन यांनी वजन कमी केले हे पाहून सगळेच आश्चर्यचकित झाले. तर 'कर्ली टेल्स'ला सांगताना अभिनेत्याने चित्रपटादरम्यान २१ दिवसांत वजन कसे कमी केले यामागील खास रहस्ये सांगितली आहेत.

'कर्ली टेल्स'ला सांगताना अभिनेता आर. माधवन म्हणाले, मी फक्त तेच अन्न खाल्ले, जे माझ्या शरीरासाठी चांगले होते. व्यायाम केला नाही किंवा धावलोसुद्धा नाही, शस्त्रक्रिया केली नाही किंवा कोणताही औषधोपचार घेतले नाहीत. नंतर त्याने एक्स (ट्विटर) ररवर्रीररप अकाउंटवरून एक व्हिडीओ शेअर केला आहे, ज्यामध्ये त्याने फक्त २१ दिवसांत वजन कमी करण्यास कशी मदत झाली याबद्दल सांगितले आहे. अधूनमधून उपवास, ४५ ते ६० वेळा अन्न चावणे, शेवटचे जेवण संध्याकाळी ६ वाजून ४५ मिनिटांनी करायचे आणि फक्त शिजवलेले अन्न खायचे. दुपारी ३ नंतर काहीही कच्चे खायचे नाही. सकाळी लांब फिरायला जाणे, रात्री लवकर झोपणे, झोपण्यापूर्वी दीड तास अगोदर मोबाईल बघणे (स्क्रीन टाइम) टाळायचे, भरपूर द्रवपदार्थ, भरपूर हिरव्या भाज्या आणि तुमच्या शरीराद्वारे सहजपणे चयापचय होणारे व निरोगी अन्न खायचे आणि काहीही प्रक्रिया केलेले अन्न खायचे नाही, असे त्यांनी सांगितले आहे. चला तर त्यांच्या आहाराबद्दल तज्ज्ञांच्या दृष्टिकोनातून समजून घेऊ इंटरमिटंट फास्टिंगची माधवनना वजन कमी करण्यास कशी झाली मदत? तर याबद्दल जाणून घेण्यासाठी दी इंडियन एक्स्प्रेसने बंगळुरूच्या सीजी रोडवरील फोर्टिस हॉस्पिटलमधील मुख्य आहारतज्ज्ञ रिंकी कुमारी यांच्याशी चर्चा केली.

आहारतज्ज्ञ रिंकी कुमारी म्हणाल्या की, अधूनमधून उपवास केल्याने अनेक संभाव्य आरोग्यदायी फायदे मिळतात. संशोधनातून असे दिसून आले आहे की, यामुळे इन्सुलिन संवेदनशीलता, वजन व्यवस्थापन आणि हृदय व रक्तवाहिन्यासंबंधी आरोग्य सुधारू शकते. या प्रकारच्या खाण्याच्या पद्धतीमुळे ऑटोफॅजी देखील सुधारू शकते, चयापचय वाढू शकते व चरबी जाळणे वाढू शकते, ज्यामुळे एकूण कॅलरीजचे सेवन कमी होते आणि मानसिक स्पष्टता सुधारते. वेळेचा चयापचय आणि हार्मोनल प्रतिक्रियांवर परिणाम होत असला तरी आहारतज्ज्ञ रिंकी कुमारी म्हणाल्या की, पोषक घटकांची गुणवत्ता महत्त्वाची असते. संतुलित जेवण आवश्यक जीवनसत्त्वे, खनिजे व ऊर्जा प्रदान करते. संपूर्ण अन्न , फळे, भाज्या, संपूर्ण धान्य, लीन प्रोटीन, हेल्दी फॅट्स यांवर लक्ष केंद्रित करा, असे आहारतज्ज्ञ रिंकी कुमारी म्हणाल्या आहेत.

## शिंदी येथे रेणुका मातेच्या यात्रेनिमित्त गाड्या ओढण्याचा कार्यक्रम संपन्न

केज/ प्रतिनिधी शिंदी येथे रेणुका
निमित्ताने गाड्या ओढण्याचा कार्यक्र
गेल्या अनेक वर्षापासून सुरू अस
ओढण्याची परंपरा आजतागायत
चालू आहे सध्या रेणुका माता
भाविक गाड्या ओढण्यासाठी बस
गावाच्या आसपासच्या गावातील शे
या देवीचा नवस फेडण्यासाठी या
दिवस मंदिरात बसून देवीची सेवा
गाड्या ओढुन नवस पूर्ण केला जा



रेणुका माता नवसाला पावणारी देवी म्हणून सर्व परिसरात आख्यायिका आहे या यात्रेसाठी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून सर्व बाहेर गावी गेलेले लोक यात्रेनिमित्त आज गावात जमा होतात आणि आजपासून पाच दिवसांनी छबीन्याचा कार्यक्रम असतो या दिवशी हे सर्व गाड्या ओढणारे भक्त पालखीला खांदा लावण्यासाठी येतात अशी पुरातन काळापासून चालत आलेली परंपरा आजतागायत शिंदी गावात चालू आहे बसत आहे या अगोदर माझे वडिल नऊ वर्षे गाड्या ओढण्यासाठी बसत होते मी पाच वर्षांचा असताना मी माझ्या वडिलांच्या खांद्यावर बसून पहिल्यांदा गाड्या ओढल्या ते आज पर्यंत मी गाड्या ओढण्यासाठी बसत आहे व यानंतर ही मी देवीची सेवा करणार आहे कारण मला देवीच्या भक्तीने कांहीच कमी पडत नाही असे बोलताना स्पष्ट केले

## १० मिनिटांमध्ये घरी बनवा आंबट गोड कैरीचे चविष्ट पापड चाट, लहान मुलांसह मोठ्यांनाही आवडेल पदार्थ

संध्याकाळच्या वेळी सगळ्यांचं छोटी मोठी भूक लागते. ऑफीमधून थकून घरी आल्यानंतर नेमकं काय खावं? हे अनेकदा सुचत नाही. नेहमीच बाहेरचे तेलकट किंवा तिखट पदार्थ खाणे आरोग्यासाठी चांगले नाही. त्यामुळे संध्याकाळच्या वेळी पचनास हलके आणि चविष्ट पदार्थ खावे. लहान मुलांपासून ते अगदी मोठ्यांपर्यंत सगळ्यांचं चाट खायला खूप आवडतं. चटपटीत पदार्थ खाण्याची इच्छा झाल्यानंतर सगळ्यात आधी चाट खाल्ले जाते. पापड चाट, चणा चाट किंवा इतर पदार्थांपासून बनवलेले चाट खूप जास्त प्रसिद्ध आहेत. मात्र आज आम्ही तुम्हाला कैरी घालून बनवलेले चविष्ट पापड चाट बनवण्याची सोपी रेसिपी सांगणार आहोत. उन्हाळ्याच्या दिवसांमध्ये बाजारात कच्ची कैरी मोठ्या प्रमाणात उपलब्ध असते. त्यामुळे घरी चाट बनवताना तुम्ही त्यात कैरीचा वापर करू शकता. जाणून घ्या कैरी पापडाचे चाट बनवण्याची सोपी रेसिपी.

साहित्य: कैरी लाल तिखट पापड मीठ कांदा टोमॅटो





लिंबाचा रस भाजलेले शेंगदाणे चाट मसाला हिरवी मिरची बारीक शेव

कृती: पापड चाट बनवण्यासाठी सर्वप्रथम, पापड हलकासा भाजून त्यांचा कोन बनवून घ्या. या पद्धतीने तुम्हाला हवे तितक्या पापडाचे कोन तयार करा.

मोठ्या वाटीमध्ये बारीक चिरून घेतलेले कांदा, टोमॅटो, कच्ची कैरी, लाल तिखट, चाट मसाला आणि हळद टाकून मिक्स करून घ्या.

त्यानंतर त्यात चवीनुसार मीठ टाकून मिक्स करा. आंबटपणा येण्यासाठी तयार केलेल्या मिश्रणात दोन चमचे लिंबाचा रस टाकून मिक्स करा. तयार करून घेतलेले पापड कोन घेऊन त्यात चाटचे मिश्रण भरून वरून बारीक शेव टाकून सर्व्ह करा. तयार आहे सोप्या पद्धतीमध्ये बनवलेले आंबटगोड पापड चाट.

## त्वचेवरील सुरकुत्या कमी करण्यापासून ते आरोग्य सुधारण्यासाठी गुणकारी ठरेल 'या' फळाचा रस, शरीर राहील थंड

वाढत्या उन्हाळ्यात शरीर थंड आणि फ्रेश ठेवण्यासाठी नियमित ताक, लिंबू सरबत, दही, कोल्ड्रिंक किंवा इतर वेगवेगळ्या सरबताचे सेवन केले जाते. मात्र नैसर्गिकरित्या शरीर थंड ठेवण्यासाठी तुम्ही बेलाच्या रसाचे सेवन करू शकता. बेलाच्या फळापासून तयार केलेला रस चवीला अतिशय गोड आणि मधुर असतो. यामध्ये असलेले घटक आरोग्य आणि त्वचेसाठी अतिशय गुणकारी ठरतात. उन्हाळा वाढल्यानंतर अनेक ठिकाणी कोल्ड्रिंक्सचे सेवन करण्याऐवजी बेलाच्या रसाचे सेवन केले जाते. या रसाचे सेवन केल्यामुळे शरीराला ऊर्जा मिळते. याशिवाय बेलाच्या रसात विटामिन सी, अँटीऑक्सिडंट्स आणि कोलेजन तयार करणारे घटक आढळून येतात. त्यामुळे रोजच्या आहारात बेलाच्या रसाचे सेवन करावे. आज आम्ही तुम्हाला बेलाच्या रसाचे सेवन केल्यामुळे शरीराला नेमके फायदे होतात, याबद्दल सविस्तर माहिती सांगणार आहोत. उन्हाळ्यात नियमित बेलाच्या रसाचे सेवन केल्यामुळे शरीराला होणारे फायदे: त्वचेमधील कोलेजन वाढते: काहीवेळा त्वचेमधील कोलेजनची पातळी कमी झाल्यानंतर त्वचा काळी आणि निस्तेज दिसू लागते. अशावेळी बेलाच्या रसाचे सेवन करावे. या रसाच्या सेवनामुळे शरीरात कोलेजनची निर्मिती होते आणि त्वचेमध्ये बदल दिसून येतात. याशिवाय या रसात असलेले विटामिन सी त्वचा चमकदार आणि सुंदर करण्यासाठी मदत करते. त्वचेमधील घट्टपणा कायम टिकवून ठेवण्यासाठी बेलाच्या रसाचे सेवन करावे. पचनक्रिया सुधारते: उन्हाळ्यात पचनसंबंधित अनेक समस्या उद्भवू लागतात. या समस्या उद्भवू लागल्यानंतर गॅस, ॲसिडिटी वाढून पचनक्रिया बिघडते. शरीराची बिघडलेली पचनक्रिया सुधारण्यासाठी बेलाच्या रसाचे सेवन करावे.

# विभागीय सहा निबंधक सहकारी संस्था कार्यालयात आमरण उपोषण

किनवट: शेख शौकत :–शास्त्रीनगर गृहनिर्माण सहकारी संस्था किनवट चे सभासद चे नावे संस्थेतून बे– कायदेशीररित्या कमी केल्या प्रकरणी व सरकारी संस्था अधिनियम १९६०चे कलम ३५ नुसार आमच्या घेतलेल्या ठरावाची सहाय्यक निबंधक सहकारी संस्था कार्यालया कडून अमल बजावणी केली नसल्याने आमचे प्लॉट आमच्या ताब्यात सहायक निबंधक कार्यालया कडून देण्यात यावे व संस्था अवसायनात टाकावी या साठी माजी नगरअध्यक्ष इसा खान सरदार खान, तिरुपती नेमानीवार युसुफ खान हे लातूर येथील विभागीय सह निबंधक सहकारी संस्था कार्यालया समोर कामगारदिनी १/५/२०२५ रोजी लातूर येथे आमरण उपोषणला बसत आहेत तसे त्यांनी दिलेल्या निवेदनात नमुद केले आहे संस्थेचे मूळ सभासद असे लिहून देत आहोत की शास्त्रीनगर गृहनिर्माण सहकारी संस्थाची नोंदणी रन.एन. एन. डी./बी.एच.आर /एच. एस.जी. २७४–८१ दिनांक १९/३/१९८१ रोजी २९ सभासदानी पैसे जमा करून जमीन/भूखंड घेतला असे असताना सुद्धा गेल्या चाळीस वर्षा पासून आज पर्यंत संस्थेचे प्लॉट भागपत्रक, वाटप प्रक्रिया करण्यात आले नाही. हेकी संस्थेचे मूळ सभासद २९ होते २९ सभासदानी मिळून संस्थाच्या नावे शेत जमीन घेतली व त्या भूखंडाचे पूर्ण पैसे देऊन खरेदी खत करून संस्थेचे नावे ७/१२ करून घेतला भूखंड घेतल्या नंतर त्यामध्ये ले आऊट मंजूर करून घर बांधण्यासाठी नगर परिषद कडे रीतसर परवाना परवाना घेतला होता परंतु काहीं अवधी नंतर चेअरमन यांनी बे कायदेशिर परस्पर २२ सभासद वाढउन संस्थेत घेतले आहे तसेच त्या २२ सभासद यांनी कोणत्याच बँकेत पैसे भरलेले नाहीत व ते संस्थेचे रीतसर सभासद झाले नाहीत. संस्थेने १९८१ अगोदरच जमीन खरेदी करून त्या भूखंडावर ले आउट टाकून प्लॉट पाडण्यात आले आहेत असे असताना पुन्हा २२ सभासद संस्थे मध्ये वाढव न्याचा प्रश्नच निर्माण होत नाही तसेच १९८१ ते ८३ संस्थेच्या जो पहिला लेखा परीक्षण करण्यात आला आहे त्या लेखा परीक्षण अहवाल मध्ये २२ सदस्याची कोणतीच नोंद घेण्यात आली नाही

तसेच संस्थेने वाढविलेले सभासदा बदल जो ठराव घेतला त्या ठरवावाचा सूचक म्हणून युसुफ खान यांच्या नावाची नोंद केली आहे जे की युसुफ खान यांना माहित नाही आणि त्या ठरावाला युसुफ खान यांची अनुमती सुद्धा नाही. असे युसुफ खान यांनी किनवट येथील सहायक निबंधक सहकारी संस्था यांच्या कडे अनेक तक्रारी दिलेल्या आहेत परंतु त्यांच्या तक्रारीची अदयाप पर्यंत दखल घेतली गेली नाही असे ही दिलेल्या पत्रात नमूद केले आहे.

संस्थेचे तत्कालीन चेअरमन हणमंतलू दडगेलवार यांचा २६ ऑगस्ट २०२१ रोजी मृत्यू झाला व दडगेलवार यांचा मुलगा रामकृष्ण दडगेलवार यांची चेअरमन पदी निवड झाली ते स्थेचे सभासद ही नव्हते तरी पण केली व निवड घेण्या साठी जी प्रक्रिया लागते ती सभासदाची मतदान घ्यावे लागते ती प्रक्रिया घेण्यात आली नाही हरकती घेण्यात आले नाही संस्थेत घरच्या परिवाराचे नावे कमीत कमी दहा नावे सामाविष्ट करण्यात आली दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे सदरील निवेदनाच्या प्रती मुख्यमंत्री, प्रधान सचिव सहकार, यांना देण्यात आले आहे.

# तरुणांनी मोबाईल सोडून पुस्तकांशी मैत्री करावी – प्रा. डॉ. सुरेश वाघमारे



लातूर, दि. १२ (जिमाका): भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त ८ एप्रिल ते १४ एप्रिल या कालावधीत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताह आयोजित करण्यात आला आहे. या अंतर्गत संविधान निर्मिती समिती अनुच्छेद, मूलभूत अधिकार आणि मूलभूत कर्तव्ये या विषयांवर प्रा. डॉ. सुरेश वाघमारे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथे आयोजित या कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती शाहू महाराज, महात्मा ज्योतिबा फुले आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना अभिवादन करून झाली. यावेळी भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे वाचनही करण्यात आले. प्रा. डॉ. वाघमारे म्हणाले, महापुरुष हे सुधारणावादी विचारांचे प्रतिनिधी आहेत. आपला संवाद माणसांशी वाढला पाहिजे. मात्र, आजची पिढी मोबाइलमध्ये व्यस्त आहे. तरुणांनी मोबाइल बाजूला ठेवून पुस्तकांशी मैत्री करणे आवश्यक आहे. या कार्यक्रमाला सहायक आयुक्त शिवकांत चिकुर्ते यांची प्रमुख उपस्थिती होती. त्यांच्यासमवेत श्रीमती के. डी. सुकळकर (गृहप्रमुख), एस. डी. सराफ (लेखाधिकारी), श्रीमती व्ही. आर. चौधरी (गृहपाल) तसेच राजेश सुरकुटलावार (कार्यालय अधीक्षक) उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नागेश जाधव यांनी केले, तर आभार श्रीराम शिंदे यांनी मानले. या कार्यक्रमाला भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथील विविध कार्यालयांचे अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी आणि विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# केशव खोब्रागडे यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर संगीत रत्न पुरस्कार





जागतिक आंबेडकरवादी साहित्य महामंडळ यांच्या वतीने संस्थेच्या ११ व्या वर्धापन दिनानिमित्त विविध क्षेत्रातील मान्यवरांचा पुरस्कार सन्मान सोहळा दि. ३० मार्च ला विदर्भ हिंदी साहित्य संमेलन सभागृह नागपूर येथे पार पडला.या सोहळ्यात मा. डॉ. प्रकाश करमाडकर ( कुलगुरू आर्यवृत्त आंतराष्ट्रीय विद्यापीठ, त्रिपुरा ) मा.डॉ. राजेश गायकवाड (सदस्य महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ मुंबई ) यांच्या हस्ते, भंडारा येथील संगीतकार केशव खोब्रागडे यांना संगीत क्षेत्रातील त्यांच्या संगीत दिग्दर्शन कार्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर संगीत रत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यावेळी मंचावर डॉ जगन कराडे समाजशास्त्र विभाग प्रमुख, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, मा. डॉ विद्याधर बन्सोड सुप्रसिद्ध साहित्यिक व विचारवंत चंद्रपूर, मा.डॉ विलास तायडे सुप्रसिद्ध साहित्यिक अकोला, मा डॉ. सुनील रामटेके सुप्रसिद्ध नाटककार व साहित्यिक मुंबई तसेच संस्थेचे अध्यक्ष डॉ. दिपक कुमार खोब्रागडे उपस्थित होते. आजवर विविध अल्बम मधील गीतांना केशव यांनी संगीतबद्ध केले असून त्यांनी संगीत दिलेला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवन कार्यावर आधारित सन्मानाचा हिरा हा भीमबुद्ध गीतांचा अल्बम रसिकाच्या पसंतीस उतरला. ज्यातील गीते प्रख्यात गायक पदमश्री सुरेश वाडकर,आदर्श शिंदे, वैशाली माडे डॉ.नेहा राजपाल, प्रा.अनिल खोब्रागडे यांनी गायली आहेत. नुकताच लहान मुलांसाठी ताऱ्यांच्या जगात या रे मुलांनो हा केशव यांनी संगीत दिलेला मराठी बालगीत अल्बम सुमीत चीीळल ले.तर्फे पब्लिश होण्याच्या मार्गावर आहे. डॉ बाबासाहेब आंबेडकर संगीत रत्न पुरस्कार स्वीकारतांना विशेष आनंद झाला तसेच मिळालेला हा पुरस्कार माझ्या आयुष्यातला मोलाचा पुरस्कार आणी प्रेरणादायी आहे असे केशव यांनी सांगितले. सेंट पिटर्स स्कुल बेला येथे संगीत शिक्षक पदावर कार्यरत असलेले केशव यांचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर संगीत रत्न पुरस्कार मिळाल्याने विविध क्षेत्रातून कौतुक केले जात आहे.

## कानडी माळी येथील रामेश्वर (महादेव) मंदिरात किर्तन सोहळा संपन्न.




केज/प्रतिनिधी चैत्र शुद्ध द्वादशी बुधवार दि.९ एप्रिल २०२५ रोजी कानडी माळी येथील रामेश्वर महादेव मंदिरात प्रतिवर्षाप्रमाणे शिवलिंग महाअभिषेक करून कीर्तन व महाप्रसाद भाविक भक्तांना देण्यात आला. शिव भोळा चक्रवर्ती। त्याचे पाय माझे चित्ती।। वाचे वदता शिवनाम। तया न बाधी क्रोध काम।। धर्म अर्थ काम मोक्ष। शिव देखता प्रत्यक्ष।। एका जनार्दनी शिव। निवारी कळिकाळाचा भेव।। शांतीब्रम्ह श्री संत एकनाथ महाराज यांच्या या उत्कृष्ट अभंगाचे ब्रम्हलीन प्रातः स्मरणीय गुरुवर्य वै.गोपिचंद बाबा भारती टाकळीकर यांचा मुलगा विद्वान श्री ह.भ.प.अविनाश भारती महाराज यांनी विवेचन करून सुश्राव्य किर्तन केले.महादेवाचे नाम जप केल्याने महादेव प्रसन्न होऊन मुखी नाम घेतल्याने त्यास क्रोध काम याची बाधा होत नाही.कळीकाळाची शिवभक्तांना भिंती राहत नाही.असा भावार्थ सांगितला.शिवभक्तांना संकटात महादेव तारतात. असे सांगितले.या कार्यक्रमाचे आयोजन श्री.राजाभाऊ दत्तात्रय कदम अपग्रेड मुख्याध्यापक जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा तरनळी केंद्र लव्हुरी ता.केज व त्यांच्या सुविद्य पत्नी सौ वत्सलाबाई राजाभाऊ कदम,या मंदिराच्या परिसरातील शिवभक्त श्री विक्रम ठकाराम राऊत, श्री शंकर श्रीरंग राऊत,लव्हु तुकाराम शिंदे, भीमराव राऊत,शेषिकलाबाई फुटाणे, अर्जुन धोंडिबा राऊत, अशोक घोडके या शिवभक्तांनी केले.या कार्यक्रमास मृदंगाचार्य नाईकनवरे, वैजनाथ राऊत बापु, श्री ह.भ.प.उमाशंकर शिंदे आण्णा ,नरहरी कदम आबा ,गायक द्वारकादास राऊत बप्पा, चंद्रकांत राऊत पाटील,विणेकरी दामोदर राऊत आण्णा, मुरलीधर नाईकनवरे,दत्तु मारुती राऊत व राजाभाऊ कदम यांचा संपुर्ण कदम परिवार हे शिवभक्त कानडी माळी येथील व परिसरातील शिवभक्त उपस्थित होते.या मंदिराच्या सर्वेनंबरमधील सर्व शिवभक्तांनी महाप्रसादाचे आयोजन केले.


## रमेश हणमंते यांच्या जाणीव कथासंग्रह आणि काळजाचे स्पंदन कवितासंग्रहाला अण्णाभाऊ साठे राष्ट्रीय वाड्.मय पुरस्कार जाहीर



लातूर :– येथील साहित्यिक रमेश हणमंते यांच्या जाणीव या कथासंग्रहाला आणि काळजाचे स्पंदन या कवितासंग्रहाला मातंग साहित्य परिषद पुणेचा साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे राष्ट्रीय पुरस्कार २०२५ जाहीर झाला आहे.सदर पुरस्काराचे रविवार,दि.१३ एप्रिल २०२५ रोजी भारतीय विचार साधना सभागृह,सदाशिव पेठ पुणे येथे होणार आहे. सन्मानचिन्ह,प्रमाणपत्र आणि पुष्पगुच्छ असे या पुरस्काराचे स्वरुप आहे. मातंग साहित्य परिषदेच्या वतीने नवोदितांना प्रोत्साहन देण्यासाठी त्यांच्या उत्कृष्ट साहित्याला पुरस्कार दिले जातात.महात्मा ज्योतिबा फुले आणि भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्ताने सदरील पुरस्कार पद्मश्री गिरीष प्रभुणे यांच्या अध्यक्षतेखाली खा.डॉ.विनय सहस्त्रबुध्दे यांच्या हस्ते,मातंग साहित्य परिषदेचे संस्थापक अध्यक्ष डॉ.धनंजय भिसे व इतर मान्यवरांच्या हस्ते रमेश हणमंते यांना प्रदान करण्यात येणार आहे.एकाच वेळी कथा आणि कविता संग्रहाला राष्ट्रीय पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे साहित्य क्षेत्रातून अभिनंदन होत आहे. रमेश हणमंते यांच्या साहित्याला यापूर्वीही अनेक पुरस्कार लाभले आहेत.

## फुले आंबेडकर जयंती निमित्त : फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलच्या वतीने शतकोत्तर १०४ व्या वैचारीक प्रबोधनात्मक कार्यशाळेचे आयोजन.




छत्रपती संभाजी नगर (प्रतिनिधी) : आपण सर्वांनाच ज्ञात आहे की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १३ एप्रिल १९२९ ला म्हटले होते की, गुलामगिरीच्या पद्धती नष्ट करून गलिच्छ चालीरीतींना मूठमाती दिली पाहिजे. तसेच १३ एप्रिल १९४७ ला म्हटले होते की, प्रोफेसरांनी अध्ययन, अध्यापन व संशोधनाच्या कामी स्वतःला वाहून घेतले पाहिजे. त्या दोन्ही विधानाच्या ९६ व्या व ७८ व्या वर्धापनदिनानिमित्त विषय : गुलामगिरीच्या पद्धती नष्ट करून गलिच्छ चालीरीतींना मूठमाती दिली पाहिजे. करिता प्रोफेसरांनी अध्ययन, अध्यापन व संशोधनाच्या कामी स्वत:ला वाहून घेतले पाहिजे. या विषयावर फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलच्या वतीने १०४ व्या वैचारीक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळेचे दिनांक १३ एप्रिल २०२५, रविवारला दुपारी २:३० वाजता आयोजन करण्यात आले आहे. तरी आपण सर्व मानवतावादी व्यक्तींनी फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलचे जणसंपर्क कार्यालय : प्लॉट क्रमांक : ४, साकेत नगर, भावसिंगपुरा रोड, छत्रपती संभाजी नगर, महाराष्ट्र. येथे उपस्थित राहावे. या कार्यशाळेला धर्मोदय बुद्ध विहाराचे संस्थापक अध्यक्ष सुरेश शिनगारे हे उद्घाटनपर मार्गदर्शन करणार आहेत. तर सिद्धार्थ महाविद्यालयाचे प्राध्यापक डॉ. मिलिंद आठवले हे प्रमुख वक्ते म्हणून मार्गदर्शन करणार आहेत. ही कार्यशाळा संचालक बी. बी. मेश्राम यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न होणार आहे. सर्व उपस्थित प्रतिनिधींना या कार्यशाळेत आपले मत व्यक्त करण्याची संधी दिली जाणार आहे. तरी सर्व मानवतावादी नागरिकांनी फुले आंबेडकर जयंती निमित्त आयोजित या कार्यशाळेला उपस्थित राहून आपले म्हणणे उपस्थितांना समजावून सांगावे, पटवून द्यावे आणि इतरांचे म्हणणे समजून घ्यावे. करिता १०४ व्या शतकोत्तर वैचारीक प्रबोधनात्मक कार्यशीळेचे आयोजन करण्यात आले आहे. असे फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलच्या वतीने कळविण्यात आले आहे.

# मराठवाडा, विदर्भात वादळी पाऊस

छ. संभाजीनगर : प्रतिनिधी राज्यात आठवड्यापूर्वी नाशिक, कोकण, विदर्भ, मराठवाड्यात अवकाळीने हजेरी लावली होती. या अवकाळी पावसाने पिकांना फटका बसल्याने शेतक–यांचे मोठे नुकसान झाल्याचे पाहायला मिळाले. आता राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये उष्णतेचा पारा ४० च्या पुढे गेला आहे.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त दिनांक १३/०४/२०२५ रोजी १०.०० ते १४.०० वाजे पर्यंत मोटार सायकल रॅली व दिनांक १४/०४/२०२५ रोजी १६.०० ते २४.०० वाजे पर्यंत मिरवणुका निमीत्त लातुर शहरातील वाहतुक बंद करणे व वाहतुक वळविणे

लातूर :– डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव निमित्त दिनांक १३/०४/२०२५ रोजी लातुर शहरात मोटार सायकल रॅली व दिनांक १४/०४/२०२५ रोजी जयंती उत्सव मोठया प्रमाणात साजरा होणार असून विविध जयंती समिती व संघटनेतर्फे वाजत गाजत मिरवणुका काढत डॉ.बाबासाहेब आंबेडकर पार्क, टाऊन हॉल, लातूर येथील मैदानावर मोठ्या संख्येने जनसमुदाय येतो व डॉ.बाबसाहेब आंबेडकर यांचे पुतळयास मानवंदनेच्या वेळी रस्त्यावर दुतर्फा गर्दी होते. त्यामुळे जनतेच्या सोईच्या व सुरक्षिततेच्या दृष्टीने लातूर शहरातील खालील मार्गावर वाहतुक बंद करणे व वाहतुक वळविणे आवश्यक आहे. लोकांच्या दैनंदीन कामकाजानिमीत्त व दळणवळणानिमीत्त त्यांना विविक्षीत ठिकाणी पोहचणे निकडीचे असते सदरच्या अडचणी लक्षात घेता दिनांक १३/०४/२०२५ रोजी सकाळी १०.०० ते १४.०० वाजे पर्यंत व दिनांक १४/०४/२०२५ रोजी दुपारी १६.०० ते रात्री २४.०० वाजे पर्यंत लातूर शहर भागातील वाहतुक बंद करुन विविध भागात वळविणे आवश्यक आहे. त्याअर्थी वरील दोन दिवशी सदर वेळेत खालील मार्गावरील वाहतुक बंद करुन वाहतुक वळविणेत येत आहे. ीं वरील दोन्ही दिवशी वाहतुकीस बंद असणारे मार्ग भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्ताने दिनांक १३/०४/२०२५ रोजी मोटार सायकल रॅली काढण्यात येणार असून रॅली मार्ग टाऊन हॉल–छत्रपती शिवाजी महाराज चौक–पाण्याची टाकी(संविधान चौक) परत छत्रपती शिवाजी महाराज चौक–राजीव गांधी चौक–बश्वेश्वर चौक–गरुड चौक–विवेकानंद चौक–शाहु चौक–गंजगोलाई– सराफ लाईन मार्गे गांधी चौक ते टाऊन हॉल या मार्गावरुन सकाळी १०.०० ते १४.०० वाजे पावेतो निघणार आहे.

तसेच दिनांक १४/०४/२०२५ रोजी दुपारी १६.०० ते २४.०० वाजे पावेतो भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती मिरवणुका या पी.व्ही.आर चौक ते एक नंबर कॉर्नर, पाण्याची टाकी(संविधान चौक), दयानंद गेट, छत्रपती शिवाजी महाराज चौक, अशोक हॉटेल मार्गे टाऊन हॉल व जुना रेणापूर नाका मार्गे छत्रपती शिवाजी महाराज चौक, अशोक हॉटेल मार्ग टाऊन हॉल व तसेच गरुड चौक ते गाव भागातील मिरवणुका गंजगोलाई, मुख्य बसस्थानक, मिनी मार्केट मार्गे टाऊन हॉल येथे येणार आहेत. त्यामुळे दिनांक १३./०४/२०२५ रोजी सकाळी १०.०० ते १४.०० आणि दिनांक १४/०४/२०२५ रोजी दुपारी १६.०० ते रात्री २४.०० वाजे पर्यंत सदरचे रोड हे सर्व प्रकारच्या वाहनांना (मोटार सायकल, थ्री व्हीलर, एस.टी.बसेस, ट्रक, टॅम्पो, टॅक्सी, ट्रॅव्हल्स, मिनीडोअर इ.) वाहतुकीसाठी बंद करण्यात यावेत. ीं तरी जनतेने खालील पर्यायी मार्गाचा अवलंब करावा :
१) पी.व्ही.आर चौकातुन शिवाजी चौक व शहरात येणारे एस.टी.बसेस पी.व्ही.आर.चौकातुन रिंगरोडने नवीन रेणापुर नाका मार्गे जुना रेणापुर नाका येथिल बसस्टॅन्डचा वापर करतील.बाकी सर्व वाहने रेणापूर नाकाकडे किंवा खाडगाव टी पॉईंट मार्गे वाडा हॉटेल किंवा खाडगाव टी पॉईंट, साई धाम, आशियाना बंगला, जुना औसा रोड याचा वापर करतील.
२) औसा रोडने शहरात येणाया एस.टी.बसेस या छत्रपती शिवाजी महाराज चौक येथील बसडेपोचा वापर करतील. तसेच चार चाकी,तीन चाकी व दोन चाकी वाहने जुना औसा रोडवरुन आशियाना बंगला, साई धाम मार्गे खाडगाव टी पॉईंट किंवा नाईक चौक मार्गे सुतमील रोड या मार्गाचा वापर करतील.
३) अंबाजोगाई रोडने लातूर शहरात येणाया एस.टी.बसेस जुना रेणापुर नाका येथिल बसस्थानकाचाच वापर करतील. अंबाजोगाई रोडने येणारी चार चाकी, तीन चाकी व दोन चाकी वाहने ही सिध्देश्वर मंदिराकडील रोड मार्गे गरुड चौकाकडे किंवा गाव भागात जातील व तसेच जुना रेणापुर नाका येथून बालाजी मंदीर या मार्गाचा वापर करतील.
४) नांदेड रोडने शहरात येणाया एस.टी.बसेस या गरुड चौक .सिद्धेश्वर चौक,नविन रेणापुर नाका मार्गे जुना रेणापुर नाका येथिल बसस्थानकाचा वापर करतील. नांदेड रोडने येणारे ट्रक, चार चाकी, तीन चाकी व दोन चाकी वाहने ही सिध्देश्वर मंदिराकडील रोड मार्गे नविन रेणापूर नाका, रेल्वे स्टेशन मार्गे पीव्हिआर चौक या मार्गाचा वापर करतील किंवा गरुड चौक, बाभळगाव नाका, बश्वेवश्वर चौक मार्गे राजीव गांधी चौक या मार्गाचा वापर करतील.
५) तसेच शहरातील वाहतुकीसाठी जनतेस १) राजस्थान विद्यालय ते पॅरलल रोडने बेद्रे कॉम्पलेक्सच्या पाठीमागून औसा रोड, आशियाना बंगला – खाडगाव रोड ते रिंगरोडचा २) गांधी चौक ते बस्वेश्वर महाविद्यालय – रमा चित्रपटगृह – खोरी गल्ली – शिवनेरी लॉज अशा मार्गाचाच अवलंब करावा. जुना रेणापुर नाका बसस्थानक येथे येणाया व जाणाया सर्व बसेस परत त्याच मार्गे रिंग रोडने जातील.

तरी सर्व नागरिकांनी वरील दोन्ही दिवशी वाहतुकीसाठी बंद असलेल्या मार्गावर वाहनांचा वापर टाळावा व पर्यायीमार्गाचा वापर करुन वाहतुक पोलीस व प्रशासनास सहकार्य करावे.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE